जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०५/२०२३
## दि.२८/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ११०/२०२३,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३५ वर्षे,रा.औरंगाबाद |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०२२ रोजी रात्रौ ०३/०० वा.कृष्णा प्रेसीडेन्सी बांबु हाऊस शिवाजीनगर,पुणेचे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची कार पार्क करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकी गाडीवरून त्यांचे जवळ येवुन,त्यांना काहीएक कारण नसताना त्यांचेकडील पैसे व मोबाईल मागु लागले. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांना नकार दिल्याने,सदर इसमांनी संगनमत करून,फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून, फिर्यादीस खाली पाडुन,कोणत्यातरी कठीण वस्तुने त्यांचे डोक्यात मारहाण करुन,डोक्याच्या उजव्या बाजुला दुखापत करून,फिर्यादी यांचे उजव्या हातातील सोन्याची अंगठी व गळयातील सोन्याची साखळी असा एकुण १,३५,०००/- रु किंमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अर्जुन नाईकवाडे ८१८०८८१९९३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ३४१/२०२३,भादविक ३७९,४२७ |
| **फिर्यादी** | महेश पाटील,वय-५२ वर्षे,रा.नेरुळ,पश्चिम,नवी मुंबई |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०२३ रोजी ०९/३५ वा. ते ०९/५५ वा.चे दरम्यान गारवा हॉटेलच्या पार्कीग मध्ये,पुणे-सोलापुर हायवे उरुळी-कांचन,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मालकीची कारचे ड्रायव्हर साईडचे पाठीमागील बाजुची काच,कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी सहाय्याने फोडुन,कार मधील चामड्याची चॉकलेटी व काळ्या रंगाची पर्स त्यामधील ९८,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ११,९०,३५५/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धायगुडे ८८८८८२००२१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३२९/२०२३,भादविक ३९२,३४,आर्म ॲक्ट कलम ४ (२५) प्रमाणे |
| **फिर्यादी** | देवानंद गालफाडे,वय-३८ वर्षे,रा.विर्लेपार्ले ईस्ट,मुंबई |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०५/२०२३ रोजी रात्रौ ०१/४५ वा.जुना सातारा-पुणे रोडवरील कात्रज घाटाचे मोठ्या वळणा जवळ,भिलारेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कात्रज गाव,पुणे येथे त्यांचे जवळील कारने जात असताना,नमुद तीन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरुन त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना शस्त्राचा धाक दाखवुन,त्यांचे गळ्यातील सोन्याची चेन व पेंडल असा एकुण १,००,०००/- रु किमतीचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धिरज गुप्ता ९८५०८२०३०७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १४२/२०२३,भादविक ३४१,५०६(२),३४,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३९ वर्षे,रा.महर्षीनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०२३ रोजी १९/३५ वा.सिटी इंटरनॅशनल स्कुल समोरील सार्वजनिक शौचालया जवळील सार्वजनिक रोडवर महर्षीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महर्षीनगर येथील त्यांचे रहाते घरी जाणेसाठी त्यांचे मोपेडवरुन जात असताना,नमुद ठिकाणी अचानकपणे यातील नमुद इसमांनी काहीएक कारण नसताना,त्यांचे दुचाकी फिर्यादी यांचे दुचाकीला आडवी लावुन,फिर्यादी यांचे डोळयां मध्ये मिर्च पावडर फेकुन,त्यांचे जवळील कोयता काढुन, फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अशोक येवले ०२०/२४४५२७६९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३६२/२०२३,भादविक ३९२,४५२,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५० वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | फिर्यादी यांची सुन व तीची आई (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०५/२०२३ रोजी १९/०५ वा.कामिना कुंज,बंगलो नं.३,सर्व्हे नं.१२/०१,आदर्शनगर, सेंट अरर्नाल्ड स्कुल समोर,वडगाव-शेरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची सुन व तीची आई यांनी संगनमत करून,चावी देण्याचे कारणावरुन फिर्यादी यांचे राहते घर कामिना कुंज,बंगलो नं.३,वडगाव-शेरी,पुणे येथील घरात जबरदस्तीने घरात घुसुन,फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,धमकी देवुन,फिर्यादी यांचे कानातील सोन्याची रिंग ९,०००/- रू किमतीची जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. स्वप्नाली गायकवाड ७७०९१३०९१७ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८०३/२०२३,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४३ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०५/२०२३ रोजी रात्री २०/०० वा.ते दि.२५/०५/२०२३ रोजी २०/३० वा.चे दरम्यान ग्लायडींग सेंटर जवळ,पुणेकडे जाणा-या रोडवर,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सुतार काम संपवुन त्यांचे सासरे यांचेसह त्यांचे घरी दुचाकीवरून जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद दुचाकीवरील अनोळखी इसमाने त्याची दुचाकी फिर्यादी यांचे दुचाकीला ओव्हरटेक करुन,फिर्यादी यांना त्यांचे गुगल-पे या खात्याचे शेवटचे ट्रान्सेक्शन दाखविण्याचे बहाण्याने फिर्यादी यांचे सासरे यांना चापट मारून,फिर्यादी यांचेकडील ६,०००/- रुपये किंमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुशिल डमरे ८८८८८५७४२४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**